वाचले

१) आदेश क्र. साप्रवि/०३/कावि/४०५/२०२६, दिनांक २२/०७/२०२६

२) क्र. साप्रवि/२/कावि/४७१/२०२६ दिनांक २६/११/२०२६

३) सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २६/११/२०२६ रोजीचे पत्र

४) अधिकार प्रदान आदेश क्रमांक साप्रवि/२/कावि/४५८/२०२६ दिनांक ०३/१०/२०२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८,सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/१/कावि/३८७ /२०२६
दिनांक २६ /११ /२०२६

विषय :- श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,पदनाम-लघुलेखक यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत... (सं.क्र.७०६७)

दुरुस्ती आदेश,

श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,लघुलेखक यांना उपरोक्त वाचले क्र. १ चे आदेशान्वये दिनांक ३०/११/२०२६ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. उपरोक्त वाचले क्र. २ चे आदेशान्वये श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,लघुलेखक यांना "लघुलेखक (उच्चस्तर)" गट-ब या पदावर पे लेवल S-१६ वेतनश्रेणी ४४९००-१४२४०० या वेतनश्रेणीत पदोन्नती दिली आहे.

प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, पिं.चिं.मनपा यांनी श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,लघुलेखक यांची लघुलेखक (उच्चस्तर) या पदावर पदोन्नती झालेली असल्याने सेवानिवृत्ती आदेश दुरुस्ती करणेकामी उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये शिफारस केलेली आहे. त्यानुसार श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,लघुलेखक यांना लघुलेखक (उच्चस्तर) या पदावर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, उपरोक्त वाचले क्र.२ चे आदेशान्वये श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,लघुलेखक यांना लघुलेखक (उच्चस्तर) या पदावरील पदोन्नती व उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये प्रशासन अधिकारी यांची शिफारस विचारात घेता **श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ** यांना **लघुलेखक** या पदावर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती ऐवजी **लघुलेखक (उच्चस्तर)** या प्रमाणे दुरुस्ती करण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

(संदिप खोत)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति - श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ, लघुलेखक (उच्चस्तर)
सामान्य प्रशासन विभाग

प्रत - लेखा विभाग

२/- श्रीम.पळसकर सुनिता एकनाथ,लघुलेखक (उच्चस्तर) यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग
४.कामगार कल्याण विभाग ५.माहिती व तंत्रज्ञान विभाग ६.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
७. सामान्य प्रशासन टेबल क्र. ७, ९, १०, १२, १३, १६, २२, संगणक कक्ष (साप्रवि)
८.पिं.चिं.मनपा कर्मचारी पतसंस्था ९.सर्व संबंधित विभाग